पश्चिम विदर्भातील सर्वाधिक अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

मुंबई

● वर्ष १ ● अंक 80 ● रविवार, दि. २३ ऑगस्ट २०२६ ● मूल्य ३ ● पृष्ठे ४

■ RNI No.- MHAR/ 26 /A4530 ■ Postal Regn. No. AKL DN/283/2024-26 ■ Web. https://epaper.citynewssuperfast.com

**सुविचार**

जिभेचं वजन खुप कमी असतं;
पण तिचा तोल सांभाळणं खुप
कमी लोकांना जमतं !!




## »थोडक्यात

### राहुल गांधींच्या कार्यक्रमाला गर्दी होऊ नये म्हणून मेट्रो थांबवली!

**पुणे :** काँग्रेस नेते आणि लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्या 'छात्रों की गूँज' कार्यक्रमासाठी पुण्यात विद्यार्थिनी-युवतींनी मोठ्या प्रमाणावर गर्दी केली होती. या कार्यक्रमावरून राजकीय कलगीतुरा रंगल्याचेही पाहायला मिळाले. 'आरटीओ पुणे' स्टेशनवर मेट्रो थांबवून ठेवल्याचा आरोप काँग्रेसचे शहराध्यक्ष प्रशांत जगताप यांनी केला. मात्र 'शनिवारी पुणे मेट्रोच्या सेवेमध्ये कोणताही खंड पडलेला नाही किंवा सेवा बंद करण्यात आलेली नाही. 'आरटीओ पुणे' या मेट्रो स्थानकात गर्दी होण्याची शक्यता लक्षात घेऊन रामवाडी ते वनाझ या मार्गासाठी मेट्रोकडून दोन अतिरिक्त ट्रेनची सोय करण्यात आली होती.

---

### पार्थ पवारांच्या घरी हाय व्होल्टेज बैठक!

मुंबई: 'राष्ट्रवादी काँग्रेस पूर्णपणे थंड पडली आहे. राज्यात पक्षाचे अस्तित्व ठळकपणे दिसत नाही. पक्षाचे विभागही फारसे कार्यरत नाहीत. समन्वयाचा अभाव असून तो वाढविण्याची गरज आहे', अशा शब्दांत राजकीय रणनीतीकार प्रशांत किशोर यांनी राष्ट्रवादी काँग्रेसच्या ज्येष्ठ नेत्यांना शनिवारी खडे बोल सुनावल्याची माहिती सूत्रांनी दिली. पक्षाच्या वाट्याला आलेल्या महामंडळांवर कार्यकर्त्यांच्या नियुत्तंया करून राज्यभर संघटना सक्रिय करण्याचा सल्लाही त्यांनी दिल्याचे समजते.

# माझ्यासाठी राजकारण हे मिशन- मुख्यमंत्री

## नागपुरात 'जेन झी' सोबत साधला संवाद, राजकारणाचा प्रवास दाखवला उलगडून

प्रतिनिधी २३ ऑगस्ट

**नागपूर :** माझी सुरुवात १८ व्या वर्षापासून झाली. लाल चौकात तिरंगा फडकवण्याचा संकल्प केला होता. बाबरी प्रकरणाच्या वेळीही मी तिथे होतो. वयाच्या २० व्या वर्षी आंदोलनात सहभागी झालो. माझ्यासाठी राजकारण हा व्यवसाय नसून मिशन आहे, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी युवकांशी संवाद साधताना आपला मुख्यमंत्री पदापर्यंतचा राजकीय प्रवास उलगडला.

राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नागपुरातील 'मंथन-४' च्या मंचावरून आपल्या राजकीय प्रवासाबाबत आणि देशाच्या लोकशाही व्यवस्थेबाबत महत्त्वाचे विधान केले आहे. तरुणांशी संवाद साधताना ते म्हणाले की, 'मी या राज्याचा मुख्यमंत्री कसा झालो, ही केवळ लोकशाहीची कमाल आणि संविधानाची खरी ताकद आहे.' तसेच, भविष्यात कोणालाही जर राज्याचे मुख्यमंत्री व्हावेसे वाटले, तर त्यासाठीही याच संविधानाचे आणि भक्कम लोकशाही व्यवस्थेचे सामर्थ्य सर्वाधिक महत्त्वाचे ठरेल, असा विश्वास फडणवीस यांनी व्यक्त केला. या कार्यक्रमाला क्रिकेटपटू तिलक वर्मा आणि बुद्धिबळपटू दिव्या देशमुख यांच्यासह विविध क्षेत्रातील युवक उपस्थित आहेत.

### भाजप हाच पेड इव्हेंट - राऊत

राहुल गांधींच्या कार्यक्रमाला भाजप नेत्यांनी आणि मुख्यमंत्र्यांनी 'पेड इव्हेंट' म्हटल्याचा संदर्भ देत राऊत म्हणाले, काल मुख्यमंत्री स्वतः म्हणाले की पुण्याचा इव्हेंट पेड होता. मग आज नागपुरात देवेंद्र फडणवीसांचा जो कार्यक्रम सुरू आहे, तो काय आहे? तुम्ही विद्यार्थ्यांचा आणि तरुणांचा अपमान करत आहात. मते विकत घेण्यासाठी महिलांना १५०० रुपये दिले जाणारी 'लाडकी बहीण' योजना काय होती? तो पण तर एक पेड इव्हेंटच होता. बिहारमध्येही १०-१० हजार दिले, तोही पेड इव्हेंट होता. मुळात भाजप हा कोणताही पक्ष राहिला नसून तो स्वतःच एक मोठा 'पेड इव्हेंट' झाला आहे. आज नागपुरात जे 'जेन झी' तरुण जाणार आहेत, ते १०० टक्के पेड आहेत, असे राऊत म्हणाले.



# वारस हक्काने वडिलांची मालमत्ता मिळते, परंतु पक्ष मिळत नाही

## रामदास कदम यांनी पुन्हा ठाकरेंना डिवचलं



प्रतिनिधी २३ ऑगस्ट

**मुंबई:** शिवसेना पक्षाचं नाव आणि चिन्ह कोणाचं यावर सुप्रीम कोर्टात सध्या सुनावणी सुरू आहे. शिवसेना ठाकरे गटाची बाजू मांडताना ज्येष्ठ वकील कपिल सिब्बल यांनी जोरदार युक्तिवाद केला आहे. तर दुसरीकडे अजून शिवसेना शिंदे गटाच्या वकिलांचा युक्तिवाद बाकी आहे. यावर आता शिवसेना शिंदे गटाचे नेते रामदास कदम यांची प्रतिक्रिया समोर आली आहे. वारसहक्काने पैसा मिळतो, पक्ष मिळत नाही. वारसाहक्काने वडिलांची मालमत्ता मिळते, परंतु पक्ष मिळत नसतो. या गोष्टींचा जर आपण अभ्यास केला तर जेव्हा सुप्रीम कोर्टात आमचे वकील युक्तिवाद करतील तेव्हा या गोष्टी अधिक स्पष्ट होतील, असं कदम यांनी म्हटलं आहे.

दरम्यान कपिल सिब्बल यांचा युक्तिवाद पाहून शिवसेना ठाकरे गटातील काही नेते हे उत्साही आहेत, त्यांना वाटत आहे की, काहीतरी चांगलं होईल असा प्रश्न देखील यावेळी कदम यांना विचारण्यात आला, यावर प्रतिक्रिया देताना कदम यांनी म्हटलं की, काही लोक हे अर्ध्या हळकुंडाने पिवळे होणारे असतात, त्यामुळे त्यांना स्वप्न पाहू द्या, लवकरच दूध का दूध आणि पाणी का पाणी होईल. असा मला विश्वास आहे.

दरम्यान राहुल गांधी हे आज पुणे दौऱ्यावर आहेत, ते छांत्रो की गुंज कार्यक्रमात सहभागी होणार आहेत, यावर देखील कदम यांनी प्रतिक्रिया दिली आहे, मी राहुल गांधी यांना एवढंच विचारेल की तुम्ही गरिबी हटावचा नारा दिला होता. किती गरिबी हटवली, शेवटच्या तळागाळातील माणसांसाठी तुम्ही काय केलं? काँग्रेस सत्तेत असताना फक्त हिंदू आणि मुस्लिम समाजामध्ये दरी पाडण्याचं काम झालं. माझा हा दावा आहे, मी जबाबदारीने बोलत आहे. मुस्लिम समजाची मतं घ्यायची सत्ता भोगायची. पण त्याच मुस्लिम समाजासाठी तुम्ही काय केलं असा सवालही यावेळी कदम यांनी राहुल गांधी यांना केला आहे. फक्त सत्तेवर डोळा ठेवून असे कार्यक्रम घेतले जातात. आता सगळं संपलं आहे. मग शाळेतील मुलं आपल्यासोबत येतील का? आणि ते जर आपल्यासोबत आले तर आपण यशस्वी होऊ का? असा त्यांचा बालिश प्रयत्न सुरू आहे, असा टोला यावेळी कदम यांनी राहुल गांधी यांना लगावला आहे.

# कोकणात जाणाऱ्या गणेशभक्तांना दिलासा, एसटीच्या 'ग्रुप बुकिंग'चे अतिरिक्त शुल्क रद्द

प्रतिनिधी २३ ऑगस्ट

**मुंबई:** संपूर्ण एसटी बस आरक्षित (ग्रुप बुकिंग) करण्यासाठी आकारण्यात येणारे ३० टक्के अतिरिक्त शुल्क अखेर एसटी महामंडळाने रद्द केले आहे. त्यामुळे गौरी-गणपतीसाठी कोकणात जाणाऱ्या भाविकांना मोठा दिलासा मिळाला आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या सूचनेनुसार एसटी महामंडळाने शुक्रवारी हा निर्णय घेतला.

परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांनी शुक्रवारी यासंदर्भात माहिती दिली. 'गणेशोत्सवाच्या काळात दरवर्षी सुमारे पाच हजार एसटी बसगाड्या आरक्षित केल्या जातात. प्रवाशांना गावी सोडल्यानंतर या बसगाड्या रिकाम्या परत आणाव्या लागतात. त्यामुळे महामंडळाला इंधन तसेच चालक आणि वाहकांच्या अतिरिक्त कामाचा खर्च सहन करावा लागतो. डिझेलच्या वाढलेल्या किमती आणि



कर्मचाऱ्यांच्या अतिकालीन भत्यात झालेली वाढ यामुळे एसटीचा खर्च वाढला आहे.

या पार्श्वभूमीवर ३० टक्के अतिरिक्त शुल्क आकारण्याचा निर्णय घेण्यात आला होता. मात्र कोकणवासी आणि गणेशोत्सव मंडळांकडून अतिरिक्त शुल्क रद्द करण्याची मागणी करण्यात आली होती. या मागणीचा विचार करून उपमुख्यमंत्री शिंदे यांनी अतिरिक्त शुल्क रद्द करण्याची सूचना केली. त्यानुसार यंदा एकेरी गट आरक्षणावर (ग्रुप बुकिंगवर) ३० टक्के अतिरिक्त शुल्क आकारले जाणार नाही,' असे मंत्री सरनाईक यांनी स्पष्ट केले. एसटी महामंडळाला होणारा संभाव्य आर्थिक तोटा अन्य मार्गांवरील प्रवासी वाहतूक वाढवून भरून काढावा, अशा सूचना ही मंत्री सरनाईक यांनी एसटी प्रशासनाला केल्या आहेत.

'गणेशोत्सवाआधीच बाप्पा पावल्याने ३० टक्के भाडेवाढीचे संकट दूर झाले. आता समूह आरक्षणासाठी कोकणवासीमध्ये उत्साह आहे. जुलैमध्ये लागू केलेल्या १३.५ टक्के भाडेवाढीबाबतही विचार व्हायला पाहिजे. भाडेवाढ करून प्रवासी दुरावतो. सेवेत सुधारणा आवश्यक आहे. खासगी वाहतूकदारांवरील निर्बंधाचे काटेकोर पालन आवश्यक आहे,' असे गणेशभक्त कोकणवासी प्रवासी संघाचे कार्याध्यक्ष दीपक चव्हाण यांनी सांगितले. मंत्री उदय सामंत यांनी केलेल्या पाठपुराव्याबद्दल त्यांनी आभार मानले.

# एका नवीन कालचक्राची सुरुवात - पंतप्रधान मोदी

वृत्तसंस्था २३ ऑगस्ट

**नवी दिल्ली :** आणखी मोठी स्वप्ने पाहणे, अधिक नवनवीन प्रयोग करणे आणि प्रगतीची नवी क्षितिजे गाठणे, यांसाठी शुभेच्छा...' असं म्हणत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भारताच्या अंतराळ प्रवासाचे कौतुक करत 'ही एका नवीन कालचक्राची सुरुवात' असल्याचे म्हटलं आहे. दरम्यान, पंतप्रधान मोदींनी नवीन तंत्रज्ञान विकसित करणाऱ्या 'जनरेशन झेन'ची देखील प्रशंसा केली. तसेच विशेष व्हिडीओ शेअर करत पंतप्रधानांनी खास शुभेच्छा दिल्या आहेत.

चांद्रयान-३ मिशनच्या विक्रम लँडरने चंद्राच्या पृष्ठभागावर सॉफ्ट लँडिंग केले. या यशानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी २३ ऑगस्ट हा दिवस राष्ट्रीय अंतराळ दिन म्हणून साजरा करण्याची घोषणा केली होती. त्यांनी अंतराळ क्षेत्रातील भारताच्या वाढत्या जागतिक भूमिकेची प्रशंसा केली आणि सांगितले की देशाचे अंतराळ क्षेत्र आता जागतिक गुंतवणूकदारांसाठी आकर्षणाचे केंद्र बनत आहे.

ते म्हणाले की, २०४७ पर्यंत विकसित भारताचे ध्येय साध्य करण्यासाठी अंतराळ क्षेत्र महत्त्वपूर्ण भूमिका बजावते. आज भारत सेमी क्रायोजेनिक इंजिन अँड इलेक्ट्रिक प्रोपल्शन यासारख्या नाविन्यपूर्ण तंत्रज्ञानात झपाट्याने प्रगती करत आहे. आपल्या भाषणांचा एक व्हिडिओ शेअर करत पंतप्रधान म्हणाले की, त्यांनी अयोध्येत म्हटले होते की ही बदलाच्या नव्या युगाची सुरुवात आहे. २०४७ पर्यंत भारताला एक विकसित राष्ट्र बनवण्याचा देशाने सामूहिक संकल्प केला आहे. हे ध्येय साध्य करण्यासाठी अंतराळ क्षेत्र महत्त्वपूर्ण भूमिका बजावेल.

# 'सामान्यांचा नगरसेवक' म्हणून ओळख सुनील इन्नानी यांनी जपले सामाजिक दातृत्व

प्रतिनिधी २३ ऑगस्ट

**अकोला :** राजकारणातील जात-धर्म आणि पक्षाच्या सीमा पलीकडे जाऊन जेव्हा केवळ 'माणुसकी' हाच एकमेव धर्म मानला जातो, तेव्हा समाजातील शेवटच्या घटकाला आशेचा एक भक्कम आधार मिळतो. असाच एक संवेदनशील आणि माणुसकीचा प्रत्यय शहरातील खदान परिसरातील हैदरपुरा (अलीम चौक) भागात पाहायला मिळाला, जिथे वंचित बहुजन आघाडीचे नगरसेवक सुनील इन्नानी यांनी आपल्या कृतीतून 'सामान्यांचा नगरसेवक' ही आपली ओळख पुन्हा एकदा सार्थ ठरवली आहे.

ऑटोरिक्षा चालवून अत्यंत हलाखीच्या परिस्थितीत कुटुंबाचा उदरनिर्वाह करणारे नावेदभाई यांच्यावर नुकताच एक मोठा प्रसंग बेतले. त्यांच्या अवघ्या दोन वर्षांच्या चिमुकल्या बाळावर रस्त्यावरील मोकाट कुत्र्याने अचानक धाव घेतली. त्या प्रचंड भीतीपोटी ती चिमुकली बालिका खाली पडली आणि तिचा उजवा हात फ्रॅक्चर झाला. भाड्याच्या घरात राहणाऱ्या आणि तुटपुंजं उत्पन्न असलेल्या नावेदभाईंसाठी हा अचानक आलेला वैद्यकीय खर्च मोठा आर्थिक फटका होता.



### मोकाट कुत्र्यांच्या त्रासावर महापालिका प्रशासनाला इशारा

या भेटीदरम्यान नावेदभाई आणि स्थानिक नागरिकांनी परिसरातील मोकाट कुत्र्यांच्या वाढत्या हैदोसाबद्दल तीव्र खंत व्यक्त केली. यावर सुनील इन्नानी यांनी अकोलेकरांच्या सुरक्षेचा हा अत्यंत गंभीर विषय असल्याचे मानून, अकोला महानगरपालिका प्रशासनापुढे हा मुद्दा मांडून मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त करण्यासाठी तात्काळ कठोर कारवाई करण्यास भाग पाडण्याचे आश्वासन दिले. आपल्या भागातील सामान्यांच्या दुःखात थेट धावून जात मदत करणारे नगरसेवक सुनील इन्नानी यांच्या या सामाजिक दातृत्वाचे व तत्परतेचे सर्वत्र कौतुक होत आहे.

### ७ दिवसांची प्रतीक्षा आणि नगरसेवक सुनील इन्नानी यांची धाव

घटना घडून सात दिवस उलटले तरी या हवालदिल कुटुंबाला कुठूनही मदतीचा हात मिळालेला नव्हता. ही माहिती मिळताच नगरसेवक सुनील इन्नानी यांनी स्वतः नावेदभाईंच्या घरी जाऊन त्यांची भेट घेतली. लहानशा घरात राहणाऱ्या या कुटुंबाची व्यथा आणि परिस्थिती पाहून ते गहिवरले. त्यांनी तात्काळ स्वतःहून त्या चिमुकलीच्या उपचारासाठी योग्य ती आर्थिक आणि नैतिक मदत केली. 'जात, धर्म किंवा पक्ष बघून मदत करणे हा आमचा विचार नाही. संकटात सापडलेल्या प्रत्येक माणसाच्या पाठीशी उभे राहणे हीच माझी आणि माझ्या पक्षाची खरी भूमिका आहे,' असे भावुक उद्गार नगरसेवक सुनील इन्नानी यांनी यावेळी काढले.

**CLASSIFIED**

**प्रवेश देणे सुरू आहे**

आय.टी.आय.व १२ वी समकक्ष कोर्सेस
१) इलेक्ट्रीशियन २ वर्ष
(२) बांधकाम पर्यवेशक १ वर्ष प्रवेश
पात्रता १० वी, १२ वी पास / नापास, टक्कवारीची अट नाही
डायरेक्ट ऑनलाईन प्रवेश
संपर्क
स्नेहदीप व्होकेशनल
ज्युनिअर कॉलेज, SBI बँकेच्या वरं, राठीनगर, अमरावती
मो. नं.- 8087958087

**शेती विकणे आहे**

मौजा चांदूर, ता.जि अकोला येथील शेत सर्व्हे नं. 188/2 आईच्या शाळेसमोर व प्रभात किड्सच्या मागील बाजूस, नगर पालिकेच्या बॉर्डरला लागून उत्तम लोकेशनचे आहे. लेआउटचे शेत 84 आर. लेआउटचे शेत विकणे आहे.
संपर्क : शरदचंद्र नेवास्कर
मो. नं.- 9822702276

# शिक्षण विभागाने 'ॲक्शन मोड'वर काम करावे- उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे

## शाळा दत्तक घ्या, दर आठवड्याला आढावा घ्या; शिक्षण विभागाला दिले निर्देश

प्रतिनिधी २३ ऑगस्ट

**मुंबई :** उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मुंबईतील नंदनवन बंगल्यावर शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे तसेच शिक्षण विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांसोबत शनिवारी तब्बल चार तास बैठक घेऊन राज्यातील शिक्षण क्षेत्राचा सविस्तर आढावा घेतला. यावेळी विभागाच्या विविध उपक्रमांची, योजनांची आणि आतापर्यंत झालेल्या प्रगतीची माहिती वरिष्ठ अधिकाऱ्यांनी एकनाथ शिंदे यांना दिली. शिक्षण मंत्रालयाकडून सुरू असलेल्या चांगल्या कामाचे कौतुक करताना एकनाथ शिंदे यांनी शिक्षण विभागाने आता मिशन मोडवर काम करून हे चांगले काम राज्यातील प्रत्येक शाळेपर्यंत आणि विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवावे, असे निर्देश दिले.

राज्यातील शाळांचे आधुनिकीकरण आणि शिक्षण व्यवस्थेत प्रत्यक्ष, दृश्यमान आणि गुणवत्तापूर्ण बदल घडवून आणण्यासाठी स्पष्ट, सर्वसमावेशक आणि कालबद्ध कृती आराखडा तयार करण्याचे निर्देश एकनाथ शिंदेंनी दिले. आपल्या मुलांच्या आकांक्षा बदलत आहेत, त्यांची स्वप्ने बदलत आहेत. त्यानुसार आपल्या शाळाही बदलल्या पाहिजेत.

### विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास केंद्रस्थानी

शिक्षण म्हणजे केवळ अभ्यासक्रम आणि परीक्षा नसून विद्यार्थ्यांचा शारीरिक, मानसिक, बौद्धिक आणि भावनिक विकास हा शिक्षणव्यवस्थेचा केंद्रबिंदू असला पाहिजे, असे एकनाथ शिंदे यांनी स्पष्ट केले. त्यासाठी विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी, पोषण, मध्यान्ह भोजन योजनेचा आढावा तसेच विद्यार्थ्यांच्या मानसिक आरोग्य आणि भावनिक स्वास्थ्यासाठी आवश्यक उपक्रम यांना अधिक महत्त्व देण्याच्या सूचना त्यांनी दिल्या.








# श्रावण, वारूळ, झोका आणि 'ए.आय.' चा काळ

श्रावण आला की निसर्ग हिरवा होतो आणि मन आठवणींच्या गावात जाऊन विसावते. पावसाच्या सरींमध्ये मातीचा सुगंध दरवळतो आणि गावाकडच्या वाटेवरचे वारूळ आपलेपणाने दिसू लागते. नागपंचमीच्या दिवशी त्या वारुळापाशी श्रद्धेने नतमस्तक होणारी संस्कृती आजही आपल्या मनात जिवंत आहे.

कधीकाळी वारूळ म्हणजे केवळ नागाचे निवासस्थान नव्हते, तर निसर्गाशी माणसाच्या नात्याचे प्रतीक होते. नागपंचमी आपल्याला सांगते—सृष्टीतील प्रत्येक जीवाचा जगण्यावर अधिकार आहे. आणि मग झाडाच्या फांदीला बांधलेला झोका श्रावणाच्या आनंदाला उंची देत असे. झोक्याची प्रत्येक उंच भरारी म्हणजे स्वप्नांची, आशेची आणि उद्याच्या सुंदर जगाची चाहूल असे. मैत्रिणींच्या गप्पा, गाणी, झिम्मा-फुगडी आणि हास्याने गावचे आकाशही जणू भरून जात असे. आज मात्र त्याच श्रावणात हातात मोबाईल आहे आणि बोटांवर संपूर्ण जग आले आहे.

वारुळापाशी जाण्याऐवजी आपण त्याचा फोटो 'सर्च' करतो आणि झोक्याचा अनुभव 'रील'मध्ये घेतो. कृत्रिम बुद्धिमत्ता क्षणात माहिती देते; पण मातीचा गंध मात्र डाउनलोड करता येत नाही. ए.आय.आपल्याला नागाची माहिती देऊ शकते, पण नागाबद्दलची सहअस्तित्वाची भावना मनात निर्माण करणे आपलेच काम आहे. ए.आय. वारुळाचे त्रिमितीय चित्र तयार करू शकते, पण त्या वारुळाशी जोडलेली आजीची आठवण निर्माण करू शकत नाही. ए.आय.श्रावणावर कविता लिहू शकते, पण पहिल्या पावसात भिजलेल्या बालपणाची ऊब तिला अनुभवता येत नाही. ए.आय. झोक्याची सुंदर प्रतिमा निर्माण करू शकते, पण झोक्यावर बसताना मनात उठणारा आनंद अनुभवू शकत नाही. म्हणूनच प्रश्न ए.आय.किती बुद्धिमान आहे, हा नाही; प्रश्न आपण किती संवेदनशील राहिलो आहोत, हा आहे. तंत्रज्ञानाने आपल्या हातात वेग दिला, पण परंपरेने आपल्या मनाला दिशा दिली. ए.आय.आपल्याला भविष्याकडे घेऊन जाईल, तर संस्कृती आपल्याला आपल्या मुळांशी जोडून ठेवेल. नागपंचमीच्या निमित्ताने सापांना केवळ पूजण्यापेक्षा त्यांच्या अधिवासाचे संरक्षण करण्याची जाणीवही निर्माण झाली पाहिजे.

झाड तोडून झोका बांधण्यापेक्षा झाड वाचवून झोका घेण्याची संस्कृती अधिक सुंदर आहे. वारूळ जपणे म्हणजे जैवविविधता जपणे आणि झाड जपणे म्हणजे पुढच्या पिढीचा श्वास जपणे. आज ए.आय. 'स्मार्ट' होत आहे; आता माणसानेही निसर्गाबाबत 'स्मार्ट' होण्याची गरज आहे. आपल्या मुलांना ए.आय. शिकवतानाच वारुळाचा अर्थ आणि नागपंचमीची पर्यावरणीय जाणीवही शिकवू या. त्यांना डिजिटल झोका देतानाच खऱ्या झाडाखाली झोका घेण्याचा आनंदही देऊ या. कारण स्क्रीनवरचा श्रावण दिसतो, पण जगता येत नाही; श्रावण जगण्यासाठी मातीशी नाते हवे. परंपरा आणि तंत्रज्ञान यांचा संघर्ष नको, तर सुंदर संवाद हवा. हातात कृत्रिम बुद्धिमत्ता असावी; पण मनात निसर्गाची खरी बुद्धिमत्ता असावी. श्रावणातील वारूळ आपल्याला मातीशी, झोका आकाशाशी आणि नागपंचमी सृष्टीशी जोडते. आणि ए.आय. आपल्याला एवढेच शिकवते—ज्ञान वाढवत चला; पण माणूसपणाची 'अपडेट' कधीही थांबवू नका!

**प्रा. डॉ. सुहास उगले,**
अकोला

# कुणाच्या खांद्यावर कुणाचे ओझे

देशात इंग्रजांचे राज्य असतांना. जनतेने त्यांच्या सत्तेच्या विरोधात उठाव करू नये म्हणून इंग्रज दडपशाहीचा वापर करत. देश स्वातंत्र्य झाला. काही लोकांना खुश ठेवण्यासाठी आपल्या सरकारतर्फे विशेष सवलती देण्यात आल्या, त्या अजूनही देणे सुरूच आहे. स्वातंत्र्य मिळून ७९ वर्ष झाली. सरकार कोणाचेही येवो, खुशमस्करी करण्याची चढाओढ सुरु आहे. मोफत धान्य, मोफत, वीज. अमक्या बहीणी, टमके भाऊ. खात्यात रक्कम टाकणं. कर्ज माफी, अनुदान, निराधार योजना, मोफत कामाचे साहित्य आणि भांडेकुंडे देण्याचे प्रकार सुरू आहेत. एका राज्याने तर महिलांना त्यांच्या लग्नासाठी ८ ग्रॅम सोन्याचे नाणे, एक सिल्कची साडी, तर प्रत्येक नवजात बाळाला १ ग्रॅम सोन्याची अंगठी देण्याची तरतूद केली आहे. केंद्र आणि सर्व राज्य सरकार यांची विविध योजनांच्या माध्यमातून काही नागरिकांना खुश करण्याची स्पर्धा सुरु आहे. मोफत योजनांचा फायदा घेणारे बरेच लोकं असे आहेत, ज्यांच्या घरी सर्वच कमावणारे आहेत. लाख रूपये किंमतीच्या दुचाकी, अँडरॉइड टिव्ही आणी स्मार्ट फोन वापरतात. पक्की घरं आहेत. काही लोकांच्या घरी वातानुकूलित यंत्र असून, काही चारचाकी वाहन देखील वापरतात. अशी मंडळी शासकीय योजनांचा लाभ लाटत आहेत. अनेक लाभार्थी योजने अंतर्गत मिळणारे धान्य, साहित्य तसेच भांडे वगैरे विकतात. योजनांचे अर्ज भरून देण्यापासून ते लाभ, अनुदान वगैरे मिळवून देण्याची पुर्ण जबाबदारी घेणारे दलाल सक्रीय आहेत. शासन या पासून अनभिज्ञ नक्कीच नाही.

यामुळे जे खरोखर गरजू आहेत, ते योजनांचा लाभ घेण्यापासून वंचित रहातात.

शासनाच्या मोफत आणि माफीच्या योजनांमुळे लोकांची काम करण्याची प्रवृत्ती कमी झाली आहे. शेती, व्यवसाय आणि उद्योगासाठी मजूर मिळणे कठीण झाले आहे. याचा उत्पादनावर अनिष्ट परिणाम झाला आहे. शासनाने अश्या योजनांचा लाभ घेणाऱ्या लाभार्थींकडून त्यांची शैक्षणिक योग्यता, वय आणि शारीरिक क्षमतेनुसार शासकीय, निमशासकीय कार्यालय तसेच प्रकल्पांवर दर महिन्याला ठराविक दिवस काम करून घ्यावे. कारण विनासायास मिळालेल्या कुठल्याही गोष्टीची किंमत नसते. मोफत आणि माफीच्या योजनांचा भार अप्रत्यक्षपणे प्रामाणिक करदात्यांवर पडतो. हा त्यांच्यावर एकप्रकारे अन्याय आहे. वंचित आणि गरजूंना मदत मिळालीच पाहिजे. परंतू जे खरोखर आहेत त्यांनाच. आपल्या येथे तर वाहत्या पाण्यात सर्वच मनसोक्त हात धुवून घेत आहेत. एकीकडे आपण 'आत्मनिर्भर भारत', बनवण्याचे स्वप्न बघतो. आणि मोफत तसेच माफी देवून लोकांना लाचार आणि परावलंबी बनवतो आहे. किती विरोधाभास आहे हा.

**हेमंत जकाते**
अकोला

# पाणी टंचाईचे संकट : कारणे, उपाय आणि लोकसहभाग

पाणी हे जीवन आहे, परंतु दरवर्षी उन्हाळा सुरू झाला की महाराष्ट्रभरात पाणी टंचाईच्या तीव्र झळा जाणवू लागतात. भूजलाचा अमर्याद उपसा, अनिश्चित पाऊस आणि पाण्याचा अपव्यय यामुळे ही समस्या दिवसेंदिवस बिकट होत आहे. वाढते नागरीकरण आणि जलस्रोतांचे प्रदूषण यामुळे पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर बनला आहे. केवळ प्रशासनावर अवलंबून न राहता ही टंचाई दूर करण्यासाठी आतापासूनच नियोजनबद्ध पावले उचलणे गरजेचे आहे.

वैयक्तिक आणि कौटुंबिक स्तरावरील उपाय

पाणी बचत ही घरापासून सुरू व्हायला हवी. घरातील नळांची गळती त्वरित दुरुस्त करणे, आवश्यक तेवढाच पाण्याचा वापर करणे आणि धुण्यासाठी वापरलेले पाणी झाडांना देणे यांसारख्या छोट्या सवयी मोठा बदल घडवू शकतात. 'रेन वॉटर



हार्वेस्टिंग' (पावसाचे पाणी साठवणे) ही काळाची गरज बनली आहे. प्रत्येक इमारतीमध्ये पावसाचे पाणी जमिनीत जिरवणे किंवा टाकीत साठवणे बंधनकारक केल्यास भूजल पातळी वाढण्यास मोठी मदत होईल.

शेती आणि औद्योगिक क्षेत्रातील सुधारणा

शेती क्षेत्रात पाण्याचा सर्वाधिक वापर होतो. पारंपारिक मोकाट पद्धतीऐवजी ठिबक (Drip) आणि तुषार (Sprinkler) सिंचनाचा वापर सक्तीचा व व्यापक केला पाहिजे. कमी पाण्यावर येणाऱ्या पिकांची निवड करणे आणि सेंद्रिय शेतीद्वारे मातीतील ओलावा टिकवून ठेवणे आवश्यक आहे. उद्योगांमध्ये वापरलेल्या पाण्यावर प्रक्रिया करून ते पाणी पुनर्वापरासाठी (Recycling) आणणे बंधनकारक केले पाहिजे, जेणेकरून चांगल्या पाण्याचा अपव्यय टळेल. 'पाणी अडवा, पाणी जिरवा' या मोहिमेला लोक चळवळीचे रूप दिले पाहिजे. गावागावांत नाला बंडींग, साखळी सिमेंट बंधारे, आणि जुन्या तलावांचे गाळ काढण्याचे काम युद्धपातळीवर झाले पाहिजे. झाडे लावणे आणि ती जगवणे याने पाऊस आकर्षित होण्यास व जमीन पाणी धरून ठेवण्यास मदत होते.

# एआय आणि वस्तूस्थिती...

"पूर्वी असे वाटायचे की चांगले शिक्षण घेतले, मोठ्या कंपनीत नोकरी मिळाली की आयुष्य सुरक्षित झाले. विशेषत : IT, software, finance, design, support अशा क्षेत्रांमध्ये काम करणाऱ्या लोकांना वाटायचे की ही career lifetime सुरक्षित आहे"...!!!

**पण आता परिस्थिती बदलत आहे.**

"पूर्वी software industry मध्ये हजारो freshers घेतले जायचे. Training देऊन projects वर बसवले जायचे. आता AI काही सेकंदांत coding, debugging, documentation, testing, reporting अशी अनेक कामे करत आहे"...!!! खरं सांगायचं तर आता फक्त fresher नाही, तर अनेक experienced लोकांची गरज सुद्धा कमी होत चालली आहे.

**आणि ही फक्त सुरुवात आहे.**

पुढच्या ५ ते १० वर्षांत लाखो white-collar jobs कमी होणार हे जवळजवळ निश्चित आहे. कारण कंपन्यांना भावना नसतात. खर्च कमी झाला की माणसं कमी होतात.

**मग प्रश्न पडतो : या साऱ्यांचं काय होणार?**

पण इथे एक महत्वाची गोष्ट समजून घ्यावी लागेल.

AI coding करू शकतो. Design करू शकतो.

Accounts करू शकतो. Reports लिहू शकतो.

पण AI भाकरी बनवू शकत नाही. Server farm मध्ये गहू उगवत नाही. Chatbot टोमॅटो पिकवत नाही. म्हणूनच पुढच्या २०-३० वर्षांत जगातील सर्वात महत्वाचा sector कोणता असेल तर तो अन्न उत्पादन. हे भावनिक विधान नाही. ही वस्तुस्थिती आहे.

**जगात कितीही technology आली तरी तीन गोष्टी कायम लागणार :**

अन्न, पाणी आणि ऊर्जा. बाकी सगळे luxury आहेत. *आजचा सर्वात मोठा भ्रम म्हणजे :*

*"Digital economy म्हणजे future."* नाही. Digital economy वर civilisation उभे राहत नाही. Civilisation उभे राहते:

**माती, पाणी, अन्न आणि ऊर्जेवर.**

म्हणून पुढच्या काही वर्षांमध्ये एक मोठा सामाजिक बदल होणार आहे. आणि तो बदल शांतपणे सुरू सुद्धा झाला आहे. शहरातून गावाकडे परत येणाऱ्या लोकांचे लोंढे. आज अनेकांना हे अतिशयोक्ती वाटेल. पण AI आणि automation किती वेगाने पुढे जात आहे हे ज्यांनी जवळून पाहिले आहे त्यांना परिस्थितीची गंभीरता समजते. पुढच्या काळात लाखो तरुण शहरात टिकू शकणार नाहीत. कारण शहरातील संपूर्ण जीवन monthly cash-flow वर चालते. Job गेली की EMI थांबते. EMI थांबली की संपूर्ण व्यवस्था कोसळते.

**मग हे लोक कुठे जाणार? ते परत गावाकडे येणार.**

कारण शेवटी शहर हे consumption economy वर चालते. पण गाव अजूनही production economy वर उभे आहे. शहर पैसा छापू शकते. Software बनवू शकते. पण अन्न तयार करू शकत नाही. म्हणूनच गावांचे महत्व पुन्हा वाढणार आहे.

**पण इथे सर्वात महत्वाचा प्रश्न आहे :**

आपण या बदलासाठी तयार आहोत का? आज बहुतेक गावे रिकामी होत आहेत. तरुण शहरात गेले. शेती वृद्धांच्या हातात राहिली. गावातील कौशल्य, उद्योग, जनावरे, तेलघाण्या, प्रक्रिया उद्योग, स्थानिक अन्न व्यवस्था हळूहळू संपत गेली.

**आता उलट प्रवाह सुरू होणार आहे.**

आणि जर सरकार, समाज आणि गावांनी यासाठी तयारी केली नाही तर प्रचंड सामाजिक अस्थिरता निर्माण होईल. कारण बेरोजगार, कर्जबाजारी आणि मानसिक तणावाखाली असलेली मोठी लोकसंख्या ही कोणत्याही समाजासाठी धोक्याची घंटा असते. म्हणून आजपासूनच गावांसाठी नवीन vision तयार करावे लागेल.

***गाव म्हणजे फक्त शेती नाही. गाव म्हणजे :***

- अन्न उत्पादन, - दूध उत्पादन, - तेलबिया उत्पादन, - स्थानिक प्रक्रिया उद्योग, - पाणी व्यवस्थापन, - ऊर्जा निर्मिती, - कौशल्य आधारित छोटे उद्योग, - स्थानिक रोजगार - decentralised economy आज आपण खाद्यतेलासाठी प्रचंड प्रमाणात बाहेरच्या देशांवर अवलंबून आहोत. एक Hormuz बंद झाला तरी संपूर्ण देश हादरतो. हे धोकादायक आहे.

**म्हणून गावागावात :**

- शेंगदाणा, - तीळ, - करडई, - सूर्यफूल, - मोहरी, - नारळ यांचे स्थानिक उत्पादन आणि प्रक्रिया पुन्हा उभी करावी लागेल. उत्तम दूध उत्पादन, स्थानिक धान्य, डाळी, भाज्या, फळे यामध्ये स्वयंपूर्णता निर्माण करावी लागेल. हे फक्त शेतीचे प्रश्न नाहीत. हे राष्ट्रीय सुरक्षेचे प्रश्न आहेत.

***भविष्यात मजबूत देश तोच असेल जो :***

- स्वतःचे अन्न तयार करेल, - स्वतःचे तेल तयार करेल, - स्वतःचे बियाणे जपेल, - स्वतःचे पाणी जपेल, - स्थानिक अर्थव्यवस्था मजबूत ठेवेल.

***बाकी फक्त GDP ने समाज टिकत नाही.***

आज अनेक तरुणांना वाटते की शेती म्हणजे backward profession. पण पुढच्या काळात उलट होऊ शकते. कारण AI मुळे information based jobs कमी होतील. पण real-world production ची गरज कायम राहील.

शेती कठीण आहे., अनिश्चित आहे., कधी तोटा होतो, कधी पाऊस फसवतो, कधी बाजार पाडतो.

**पण एक गोष्ट लक्षात घ्या.**

जगातील कोणत्याही संकटात अन्न उत्पादकाची गरज संपत नाही, Corona मध्ये सर्व उद्योग बंद झाले, पण शेती चालू होती, युद्ध झाले तरी अन्न लागते, मंदी आली तरी अन्न लागते, AI आले तरी अन्न लागते. म्हणून शेतीकडे आता फक्त पारंपरिक व्यवसाय म्हणून पाहून चालणार नाही. ती future survival system म्हणून पाहावी लागेल. पण यासाठी शेतीची पद्धत सुद्धा बदलावी लागेल.

**पुढच्या काळातील शेती म्हणजे :**

- direct customer model, - residue free food, - local food processing, - multi cropping, - natural farming, - seed saving, - agro forestry, - community supported agriculture, - on-farm value addition आणि महत्वाचे म्हणजे AI चा वापर करून शेती अधिक efficient करता येईल.

***भविष्यात सर्वात सुरक्षित लोक कोण असतील?***

***ज्यांच्याकडे :***

- जमीन आहे, - पाणी आहे, - अन्न उत्पादन क्षमता आहे, - कौशल्य आहे, - अनेक income sources आहेत, - community network आहे.

***आजचा सर्वात मोठा trap म्हणजे :***

*मोठा पगार + मोठे EMI + एकच income source, *_"Job गेली की सगळे कोसळते"...!!!, पण ग्रामीण भागात अजूनही माणूस काही प्रमाणात स्वतःचे अन्न उगवू शकतो. जनावरे ठेवू शकतो. कमी खर्चात जगू शकतो. हे future security आहे, म्हणून पुढचा काळ हा गावांचा असू शकतो, पण त्यासाठी गावांनी फक्त शहराची स्वस्त copy बनून चालणार नाही. गावांनी उत्पादन केंद्र बनावे लागेल. आणि हे काम सरकार एकटे करू शकत नाही. शेतकरी, तरुण, उद्योग, ग्रामपंचायत, सहकारी संस्था, स्थानिक उद्योजक सगळ्यांना मिळून नवीन ग्रामीण अर्थव्यवस्था उभी करावी लागेल.

**नाहीतर पुढच्या दशकात आपण एक विचित्र समाज पाहू :**

शहरात नोकऱ्या नाहीत, गावात उत्पादन नाही, आणि लोकांकडे कौशल्य असूनही उपयोग नाही. ही वेळ अजून गेलेली नाही. पण तयारी आत्ताच सुरू करावी लागेल ! पण अनेकजण हा मोठा लेख शेवटपर्यंत वाचणारच नाहीत. जे वाचतील तेही फार काही करणार नाहीत. थंडच बसतील ! "पण काळ थांबणार नाही"...!!!

# भारत चंद्राच्या दक्षिण ध्रुवीय प्रदेशाजवळ उतरणारा पहिला देश!

## आज राष्ट्रीय अंतराळ दिन

२३ ऑगस्ट २०२३ रोजी, इस्रोने चांद्रयान-३ चे लँडर आणि रोव्हर चंद्रावर यशस्वीरित्या उतरवून एक महत्त्वपूर्ण टप्पा गाठला. यासह, भारत चंद्रावर उतरणारा चौथा देश आणि चंद्राच्या दक्षिण ध्रुवीय प्रदेशाजवळ उतरणारा पहिला देश ठरला. सॉफ्ट-लँडिंगनंतर प्रज्ञान रोव्हर यशस्वीरित्या तैनात करण्यात आला. या कामगिरीची दखल घेऊन, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २३ ऑगस्ट हा भारतात 'राष्ट्रीय अंतराळ दिन' म्हणून घोषित केला.

पहिला राष्ट्रीय अंतराळ दिन २०२४ मध्ये संपूर्ण भारतात साजरा करण्यात आला. भारत सरकारने भारताच्या अंतराळ मोहिमांची उपलब्धी दर्शवण्यासाठी आणि तरुणांना प्रेरणा देण्यासाठी एक महिनाभर चालणारी मोहीम आयोजित केली. 'चंद्राला स्पर्श करताना जीवनाला स्पर्श करणे: भारताची अंतराळ गाथा' ही त्याची संकल्पना , अंतराळ संशोधनाचा समाज आणि तंत्रज्ञानावरील महत्त्वपूर्ण प्रभाव अधोरेखित करते. राष्ट्रीय अंतराळ दिनानिमित्त २०२४ एनएसपीडीचा दोन दिवसीय अंतिम सामना भरत मंडपम येथे आयोजन करण्यात आले होते. ज्यामध्ये



भारताच्या अंतराळ कामगिरीशी संबंधित विविध उच्च-स्तरीय सत्रे, परस्परसंवादी प्रदर्शने आणि महत्त्वपूर्ण घोषणा सादर करण्यात आल्या.

## भारतीय अंतरीक्ष हॅकाथॉन

भारतीय अंतरीक्ष हॅकाथॉन २०२४ हा राष्ट्रीय अंतराळ दिन-२०२४ च्या उत्सवाचा एक प्रमुख भाग आहे, ज्याचा उद्देश अंतराळ तंत्रज्ञानातील नाविन्यपूर्ण कल्पना आणि उपाय शोधणे आहे. भारत अंतराळ संशोधन आणि अन्वेषणामध्ये प्रगती करत असल्याने, हा प्रमुख कार्यक्रम नवोन्मेषकांच्या पुढील पिढीला देशाच्या अंतराळ मोहिमांमध्ये योगदान देण्यासाठी प्रेरित करण्याचा प्रयत्न करतो. इस्रोद्वारे आयोजित, राष्ट्रीय-स्तरीय हॅकेथॉनमध्ये विद्यार्थ्यांना विविध समस्या सादर केल्या जातील, ज्यामुळे त्यांना सर्जनशील उपाय विकसित करण्यास प्रोत्साहन मिळेल. निवडक केंद्रांवर अंतिम फेरीत स्पर्धा करण्यासाठी त्यांच्या प्रतिसादांच्या आधारावर संघांची निवड केली जाईल. अंतिम फेरीतील उत्कृष्ट विद्यार्थ्यांना इस्रो केंद्रांमध्ये इंटर्नशिपची संधी दिली जाईल. हॅकाथॉनच्या पहिल्या तीन विजेत्यांना २३ ऑगस्ट २०२४ रोजी राष्ट्रीय अंतराळ दिनाच्या सोहळ्यादरम्यान त्यांचे ॲप्लिकेशन्स सादर करण्याची संधी मिळेल.

## २०२४ एनएसपीडी स्पेस ऑन व्हील्स

या प्रकल्पामध्ये फिरत्या प्रदर्शन बसेसचा समावेश आहे, ज्या राष्ट्रीय अंतराळ दिनाच्या सोहळ्यादरम्यान विविध विद्यापीठे आणि महाविद्यालयांमध्ये प्रवास करतील. २४ जानेवारी २०२३ रोजी, इस्रोने वैज्ञानिक ज्ञान आणि जागरूकता वाढवण्यासाठी समर्पित असलेल्या विज्ञान भारती या प्रमुख विज्ञान संस्थेसोबत 'स्पेस ऑन व्हील्स' नावाच्या एका अनोख्या उपक्रमावर सहयोग करण्यासाठी सामंजस्य करार केला. या उपक्रमाचे मुख्य उद्दिष्ट भारतातील सर्व राज्यांमधील शालेय विद्यार्थ्यांपर्यंत इस्रोच्या कार्यांबद्दल आणि भारताच्या अंतराळ मोहिमांबद्दल माहिती पोहोचवणे आहे. हे सहकार्य अंतराळ विज्ञानाबद्दलची सार्वजनिक समज वाढवण्यासाठी आणि अंतराळ संशोधनामध्ये अधिक रुची निर्माण करण्यासाठी विभा आणि इस्रो यांच्यातील एक संयुक्त प्रयत्न दर्शवते.

## इस्रो स्पेस ट्युटर्स: सहभाग आणि शिक्षण

स्पेस ट्युटर्स हे इस्रोमध्ये नोंदणीकृत असलेले शिक्षक आणि मार्गदर्शक आहेत, जे अवकाश विज्ञान आणि तंत्रज्ञान शिक्षणाला पुढे नेण्यासाठी समर्पित आहेत. विविध जनजागृती उपक्रमांद्वारे विद्यार्थी आणि जनतेला सहभागी करून घेण्यात ते महत्त्वाची भूमिका बजावतात. बदलत्या शैक्षणिक परिस्थितीला प्रतिसाद म्हणून, इस्रो अवकाश क्षेत्रात समृद्ध ज्ञान प्रसारित करण्यासाठी कटिबद्ध आहे. याला पाठिंबा देण्यासाठी, अनेक स्वयंसेवी संस्था आणि शैक्षणिक संस्थांनी अशा कार्यप्रणाली विकसित केल्या आहेत, ज्या विद्यार्थ्यांना नोंदणी करण्यास आणि अवकाश विज्ञान व तंत्रज्ञानाचे अन्वेषण करण्यास प्रोत्साहित करतात. या कार्यप्रणालींमध्ये पुस्तके आणि प्रयोगशाळेतील कामासह शैक्षणिक मॉड्यूल्सचा समावेश असतो, जे नियमित वर्गशिक्षणाला पूरक ठरतात. याव्यतिरिक्त, डिजिटल सामग्री निर्माते आणि ऑनलाइन शिक्षक आभासी शिक्षणाचे अनुभव देण्यासाठी सोशल मीडिया आणि मोबाइल ॲप्लिकेशन्सचा वापर करतात. इस्रोचे १२० नोंदणीकृत स्पेस ट्युटर्स अंतराळ शिक्षणाला प्रोत्साहन देण्यासाठी आणि अंतराळ उपक्रम व अनुप्रयोगांबद्दल जागरूकता निर्माण करण्याच्या उद्देशाने देशभरात व्याख्याने, प्रश्नमंजुषा आणि प्रदर्शने यांसारखे पोहोच कार्यक्रम आयोजित करतील. विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक जिज्ञासा आणि नाविन्यपूर्ण विचारसरणी वाढवण्याच्या त्यांच्या प्रयत्नांना चालना देण्यासाठी त्यांना प्रचारात्मक साहित्याद्वारे पाठिंबा मिळेल.

## इस्रो रोबोटिक्स चॅलेंज

इस्रो रोबोटिक्स चॅलेंज ८ नोव्हेंबर २०२३ रोजी सुरू झाले, ज्यामध्ये नोंदणी आणि प्रस्ताव सादर करण्यासाठी वाढीव कालावधी देण्यात आला होता. संघांची निवड आणि स्पर्धेचा तपशील जाहीर झाल्यानंतर, सहभागींनी व्हिडिओ सबमिशन आणि डिझाइन अहवालांद्वारे त्यांचे हार्डवेअर आणि रोव्हरची कार्यक्षमता प्रदर्शित केली. 'चला एक अवकाश रोबोट बनवूया' या टॅगलाइनसह, हे आव्हान विद्यार्थ्यांना अवकाश रोबोटिक्समध्ये सहभागी होण्याची संधी देते. संस्थांमधील संघांना वास्तविक-जगातील अवकाश रोबोटिक्स आव्हानांना सामोरे जाऊन, परग्रहीयांपासून प्रेरित क्षेत्रास्ाठी रोबोट तयार करण्याचे काम दिले जाते.

# बोहरा समाजातर्फे ईद-ए-मिलाद-उन-नबीनिमित्त मिरवणूक

# सामाजिक सलोख्याचे घडले दर्शन

## अश्वारुढ पथक आणि सुसज्ज बँड ठरले मुख्य आकर्षण

प्रतिनिधी २३ ऑगस्ट

**अकोला:** पैगंबर मोहम्मद साहेब यांच्या १४४८ व्या जयंतीनिमित्त (मिलाद-उन-नबी) अकोला शहरात अंजुमन-ए-नजमी जमात कमिटी व दाऊदी बोहरा समाजाच्या वतीने अत्यंत उत्साहात, भव्य आणि शिस्तबद्ध मिरवणुकीचे आयोजन करण्यात आले. मिरवणुकीच्या अग्रभागी सजवलेले घोडे आणि त्यावर पारंपरिक पोशाखात स्वार झालेले तरुण मिरवणुकीची शोभा वाढवत होते. त्यामागे बोहरा समाजाचे सुसज्ज बँड पथक निळ्या रंगाची शेरवानी, फेटा व पारंपरिक टोपी परिधान करून ड्रम तसेच विविध वाद्यांच्या तालावर सुमधुर धुन सादर करत आगेकूच करत होते. लहान मुलांनीही अत्यंत उत्साहाने व शिस्तीत वाद्यवृंदात सहभाग नोंदवला.





सिटी कोतवाली परिसर आणि शहराच्या मुख्य मार्गावरून जात असताना मिरवणुकीचे ठिकठिकाणी जोरदार स्वागत करण्यात आले. लोकप्रतिनिधी, विविध राजकीय पक्षांचे नेते आणि सर्वधर्मीय बांधवांनी बोहरा समाजातील धर्मगुरू व गरिबांची गळाभेट घेऊन ईदच्या शुभेच्छा दिल्या. मिरवणुकीत बोहरा समाजाच्या महिला व विद्यार्थिनींनी हातात संदेश देणारे फलक (बॅनर्स) धरून सहभाग घेतला. अत्यंत शांततामय, धार्मिक व सलोख्याच्या वातावरणात ही मिरवणूक संपन्न झाली.

# प्रेम प्रकरणातून तरुणाची हत्या

प्रतिनिधी २३ ऑगस्ट

**उरळ** : उरळ पोलीस स्टेशन अंतर्गत येणाऱ्या खांबेरा गावात प्रेम प्रकरणातून एका तरूणाची निर्घण हत्या करण्यात आली. याप्रकरणी उरळ पोलिसांनी मुलीच्या मुलीचे वडीलांसह दोन व्यक्तीविरुद्ध खुनाचा दोघांवर गुन्हा दाखल केला आहे.

याप्रकरणी शनिवारी पोलीस स्टेशनमध्ये तक्रार दाखल करण्यात आली. तक्रारीनुसार, मूत मुलाचे मुलीसोबत प्रेम प्रकरण असल्याचा राग मनात धरून वासुदेव रामभाऊ भरणे, चैतन्य वासुदेव भरणे व सचिन सारंगधर भरणे यांनी शैलेश श्रीकृष्ण तेलगोटे या तरुणाच्या डोक्यावर तसेच शरीरावर लोखंडी रोड, टोकदार वस्तु मारून त्याची हत्या केली. या प्रकरणातील तीनही आरोपींना अटक करण्यात आली असून बीएनएसच्या कलम 103 (1), 151 (2), 3 (5) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा तपास उरक पोलीस स्टेशनचे ठाणेदार जनार्दत खंडेराव करीत आहेत.

# गेल्या पंचवीस वर्षात पहिल्यांदाच बदाम काजूवर भारी...

**अकोला:** श्रावण महिन्यापासून सण आणि उत्सवांची मोठी लगबग सुरू होते नागपंचमी रक्षाबंधन नारळी पौर्णिमा त्यानंतर येणारा गणेशोत्सव आणि नवरात्र उत्सवामुळे बाजारात खरेदीची मोठी लगबग असते या सणासुदीच्या काळात देवपूजेसाठी आणि विविध गोडधोड पदार्थ बनवण्यासाठी नारळ तसेच सुके खोबरे व सुक्या मेवाला मोठी मागणी असते मात्र यंदा सणासुदीच्या काळात महागाईमुळे सर्वसामान्यांच्या बजेटचे अक्षरशा: खोबरे झाले आहे.

### शहरात नारळ व खोबऱ्याचे दर किती?



गेल्या महिन्याभरात ओले नारळ व सुक्या खोबऱ्याच्या दरात वाढ झाली आहे किरकोळ बाजारात तेरी पंचवीस ते तीस रुपयांना मिळणारा एक नारळ सध्या बाजारात 35 ते 45 रुपयांना विकला जात आहे तसेच गेल्या दोन महिन्यापूर्वी 250 ते 310 रुपये किलोने मिळणारे सुके खोबरे आता थेट 300 ते 400 रुपये किलो प्रमाणे विकले जात आहे.ऐन सणासुदीच्या तोंडावर खोबरे महाग झाल्याने किराणा खर्चात थोडी वाढ होणार आहे



### गेल्या पंचवीस वर्षात पहिल्यांदाच बदाम काजू वर भारी

सणासुदीच्या हंगामात पहिल्यांदाच बदामाच्या दराने काजूला ओव्हरटेक केले आहे ही स्थिती 25 वर्षानंतर निर्माण झाली आहे बदामाच्या दरापेक्षा काजूचे दर पहिल्यांदाच कमी आहेत सध्या बदामाचा दर 1200 रुपये किलो तर कालचा दर 1050 रुपये किलो झाला आहे बदामाच्या तुलनेत काजू महाग सुकामेवा म्हणून ओळखला जातो त्यामुळे अनेक वर्षापासून किरकोळ बाजारात काजूचा दर बदाम पेक्षा अधिक राहिला आहे मात्र यंदा परिस्थिती काहीशी उलटली आहे बदाम उत्पादनात घट झाल्याने पुरवठ्यावर परिणाम झाला आहे त्यामुळे यंदा मागील 25 वर्षात बदाम काजू वर भारी पडला आहे.

# 'ज्ञान माऊली'च्या माध्यमातून संत ज्ञानेश्वरांच्या विचारांचा आज जागर!

प्रतिनिधी २३ ऑगस्ट

**अकोला** : संत ज्ञानेश्वर माऊलींच्या ७५० व्या जन्मजयंती वर्षानिमित्त महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागांतर्गत सांस्कृतिक कार्य संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या वतीने अमरावती महसूल विभागातील अमरावती, बुलढाणा, अकोला, वाशिम, यवतमाळ जिल्ह्यांमधील सर्व तालुक्यांमध्ये एकाच वेळी तालुकास्तरीय 'ज्ञान माऊली' हा विशेष सांस्कृतिक कार्यक्रम २३ ऑगस्ट रोजी सायंका ६.३० वाजता होणार आहे. संत ज्ञानेश्वर माऊलींच्या जीवनकार्याचा, अध्यात्मिक विचारांचा आणि संतपरंपरेतील योगदानाचा परिचय जनसामान्यांना करून देण्याच्या उद्देशाने 'ज्ञान माऊली' या विशेष सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाच्या माध्यमातून संत ज्ञानेश्वरांच्या जीवनातील प्रेरणादायी प्रसंग, संतविचार, भक्तीपरंपरा आणि महाराष्ट्राच्या समृद्ध सांस्कृतिक वारशाचे दर्शन रसिकांना घडणार आहे. संत ज्ञानेश्वरांच्या ७५० व्या जन्मजयंती वर्षानिमित्त राज्यभर विविध अध्यात्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत असून, संतपरंपरेचा वारसा नव्या पिढीपर्यंत पोहोचविणे, संतांच्या विचारांचे जतन व संवर्धन करणे आणि महाराष्ट्राच्या सांस्कृतिक वैभवाची जनमानसात व्यापक ओळख निर्माण करणे हा या उपक्रमाचा प्रमुख उद्देश आहे.

अमरावती महसूल विभागातील सर्व तालुक्यांमध्ये एकाच वेळी तालुकास्तरीय कार्यक्रम आयोजित करून संत ज्ञानेश्वरांच्या विचारांचा आणि संतपरंपरेचा व्यापक प्रसार करण्याचा प्रयत्न या उपक्रमातून करण्यात येत आहे.

'ज्ञान माऊली' या विशेष सांस्कृतिक कार्यक्रमास विनामूल्य प्रवेश असून, अमरावती विभागाअंतर्गत अमरावती, बुलढाणा, अकोला, वाशिम, यवतमाळ परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून संत ज्ञानेश्वर माऊलींच्या अध्यात्मिक, सांस्कृतिक आणि सामाजिक विचारांचा अनुभव घ्यावा, असे आवाहन सांस्कृतिक कार्य संचालनालयाचे संचालक प्रशांत खेडेकर यांनी केले आहे.



# ऑनलाईन वाहन विक्रीच्या नावावर 5.50 लाखांची फसवणूक

प्रतिनिधी २३ ऑगस्ट

अकोला : ऑनलाईन वाहन विक्रीच्या नावाखाली 5 लाख 50 हजार रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी खदान पोलिसांनी नागपूर येथून एका आरोपीला अटक केली आहे. तांत्रिक तपासाच्या आधारे पोलिसांनी मो. सुलेमान जामीन मुगल, वय 30 वर्षे, रा. नागपूर याला ताब्यात घेतले. मिळालेल्या माहितीनुसार, फिर्यादी यांचा चारचाकी वाहन खरेदी-विक्रीचा व्यवसाय आहे. आरोपीने ऑनलाईन वाहन विक्री करण्याचे आमिष दाखवून फिर्यादीकडून विविध ऑनलाईन व्यवहारांद्वारे एकूण 5 लाख 50 हजार रुपये घेतल्याचा आरोप आहे. या प्रकरणी खदान पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. गुन्ह्याचा तपास सुरू असताना पोलिसांनी

आरोपीचा शोध घेत त्याला नागपूर येथून ताब्यात घेतले. चौकशीदरम्यान गुन्ह्यातील त्याचा कथित प्रत्यक्ष सहभाग निष्पन्न झाल्यानंतर त्याला अटक करण्यात आली असून सध्या आरोपी खदान पोलिसांच्या पोलीस कोठडीत आहे. दरम्यान, या गुन्ह्यात आणखी आरोपींचा सहभाग आहे का, याचा तपास पोलिसांकडून सुरू असून या कारवाईतून ऑनलाईन फसवणुकीचे मोठे रॅकेट उघड होण्याची शक्यता पोलिसांनी व्यक्त केली आहे. सायबर पोलीस अकोला यांच्या सहाय्याने फिर्यादीची फसवणूक झालेल्या रकमेतून 1 लाख रुपये फ्रिज करण्यात पोलिसांना यश आले आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक अर्चित चांडक, अपर पोलीस अधीक्षक चंद्रकांत रेड्डी आणि उपविभागीय पोलीस अधिकारी, अकोला शहर सुदर्शन पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

# कापशी तलाव अकोलेकरांची तहान भागवू शकेल का?

## पाणी टंचाई लक्षात घेऊन उपाय शोधावे लागतील

प्रतिनिधी २३ ऑगस्ट

**अकोला:** महान प्रकल्पाच्या भरोशावर राहणे किती योग्य आहे हा विचार करावा लागणार आहे. यावेळी निर्माण झालेली परिस्थिती चिंताजनक आहे. ऑगस्ट महिना कोरडा असून महान प्रकल्पात केवळ २५ टक्के जलसाठा आहे. त्यामुळे निर्माण होणारी टंचाई लक्षात घेऊन कापशी तलावातील पाणी अकोला शहरासाठी वापरता येईल का याची चाचपणी व्हावी असे बोलले जात आहे. वान प्रकल्पातील पाणी उपयोगी पडू शकते पण सोबतच अन्य पर्याय शोधणे आवश्यक आहे.

कापशी तलावातील पाणी जुन्या शहरासाठी वापरात येऊ शकते. या बाबतीत



आमदार वसंत खंडेलवाल यांनी प्रशासकीय अधिकाऱ्यांसोबत कापशी तलावाची पाहणी केली होती. सध्या निर्माण झालेली स्थिती तसेच भविष्याचा विचार करून पावले टाकणे हितकारक ठरेल असे बोलले जात आहे.

अल निनोचा वातावरणावर झालेला परिणाम जाणवू लागला आहे. पाऊस अनियमित स्वरूपाचा आहे. या भागात काही दिवसांपासून ढगाळ वातावरण निर्माण झाले आहे. परंतु पाऊस नाही. वातावरणात उष्णतामान वाढलेले दिसते. याचा परिणा पिकांवर देखील होत आहे.

या पावसाळ्यात आतापर्यं सरासरीपेक्षा कमी पाऊस झाल आहे. यंदा पावसाळा लांबण्याच शक्यता व्यक्त केली जात आहे परंतु अकोला शहरासह औद्योगिव वसाहत आणि महान प्रकल्पाव अवलंबून असलेल्यांना पाण उपलब्ध होण्यासाठी आतापासू उपाय योजना करणे आवश्यव आहे. कारण पाऊस लांबला त परिस्थिती भीषण होऊ शकते.

### बैलगाडीला धडकल्याने दुचाकीस्वार ठार

**अकोला:** दुचाकी बैलगाडीला धडकल्याने कारंजा येथील युवक ठार झाला. शनिवारी सायंकाळी मूर्तिजापूर तालुक्यातील सिरसो गावाजवळ हा अपघात झाला. संदीप विलास वीर २६, कारंजा अशी मृत युवकाची ओळख पटली.

सिरसो येथील सुरेश ज्ञानेश्वर मेहरे यांनी या बाबत फिर्याद दिली. मेहरे यांना गावातील बाबुसिंग थोरात यांनी फोन व्दारे माहिती दिली की, सिरसो फाटयावरुन दर्यापुरकडे जाणाऱ्या रोडवर संदीप विलास वीर, २६, रा. कारंजा जि. वाशिम यांची मोटारसायकल क्र. एम एच २९ बीके २९५६ ने सदर राजेंद्र काळे यांच्या बैलबंडीला मागुन धडक मारली. त्यामुळे ते मरण पावले. फीर्यादीच्या जबानी रिपोर्टवरुन आकस्मिक मृत्यू म्हणून मूर्तिजापूर पोलिसांनी नोंद घेतली. तपास सुरू आहे.

# राजुरा गावात 12 वर्षे आधी घेतलेल्या बोअरवेलमधून येत आहे गरम पाणी

प्रतिनिधी २३ ऑगस्ट

**मालेगाव** तालुक्यातील राजुरा गावात 12 वर्षे आधी घेतलेल्या बोरवेल मधून काही दिवसांपासुन गरम पाणी येत आहे.हा पाणी इतका गरम आहे की,ते आंघोळीसाठी वापरता येतं.ही बाब गावात पसरताच मोठ्या संख्यने नागरीक पाणी पाहण्यासाठी गर्दी करत आहे.सगळीकडे हा विषय चर्चिला जात आहे.

वाशिमच्या मालेगाव तालुक्यातील राजुरा येथे 12 वर्षे जुन्या बोअरवेलमधून गेल्या 20 ते 25 दिवसांपासून चक्क गरम पाणी येत आहे. हे पाणी आंघोळीसाठी वापरता येईल इतपत गरम असल्याने गावात कुतूहल

### पाणी पाहण्यासाठी नागरिकांची मोठी गर्दी



निर्माण झाले आहे. आरोग्य विभागाने पाण्याचे नमुने घेतले असून, प्राथमिक तपासणीत पाणी पिण्यायोग्य नसल्याचे आढळले आहे.

पाण्यातील रासायनिक घटक वाढल्याचेही समोर आले असून, नमुने पुढील तपासणीसाठी नागपूरला पाठवण्यात आले आहेत. या अहवालानंतरच पाणी अचानक गरम होण्याचे नेमके कारण स्पष्ट होणार आहे.मात्र हे पाणी पाहण्यासाठी नागरिक मोठी गर्दी करत असून हा विषय चर्चेचा बनला आहे.

# अमली पदार्थ गुन्ह्यातील आरोपी ताब्यात

प्रतिनिधी २३ ऑगस्ट

**अमरावती** : २१४ ग्रॅम मॅफेड्रान (एम.डी.) ड्रग्सच्या गुन्हयातील मुख्य सुत्रधार तौसिफ मल्का मंजूर मल्का, राहणार मुलतानपूरा, पोलीस स्टेशन यशोधर्मन नगर /YD जिल्हा मंदसौर, राज्य मध्यप्रदेश, यास ताब्यात घेण्यात आले आहे. गुन्हे शाखा, युनिट कं. १ अमरावती शहर नी अटक केल्याची उल्लेखणीय कामगीरी केली.



२३/०७/२०२६ रोजी पोलीस स्टेशन नागपुरी गेट येथे सरतर्फ फिर्यादी स.पो. नि. दशरथ आड, गुन्हे शाखा, युनिट क्रं. १, अमरावती शहर यांचे फिर्यादीवरून अपराध कं ३५१/२०२६ कलम ८ (क), २१ (क), २२ (क), २९ एन.डी. पी.एस. ॲक्ट प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला होता. सदरचा गुन्हा हा संवेदनशील स्वरुपाचा असल्याने सदर गुन्हयाचा तपास गुन्हे शाखा, युनिट कमांक १, अमरावती शहर स्वतः करीत आहे. यापुर्वि सदर गुन्हयात सईद खान वल्द शरीफ खान, वय ४१ वर्षे, रा. पाटीपूरा, अमरावती यांस दि. २३/०७/२०२६ रोजी अटक करण्यात आले होते. पुढे तपासात निष्पन्न करुन युनूस मोहम्मद रमजान, वय ४३ वर्षे, रा. दाउदी नगर, गल्ली-०२, खजराणा, जि. इंदौर, मध्यप्रदेश यांस खजराणा येथे २०.५ ग्रॅम मॅफेडान (एम.डी.) ड्रग्स सह २८/०७/२०२६ अटक करण्यात आली होती. सदर गुन्हयाचे तपासात मुख्य सुत्रधार तौसिफ मल्का मंजूर मल्का, राहणार मुलतानपूरा, पोलीस स्टेशन यशोधर्मन नगर YD जिल्हा मन्दसौर, राज्य मध्यप्रदेश हाच असल्याचे निष्पन्न झाल्याने तौसिफ मल्का बाबत सतत पाठपुरावा करून गुन्हे शाखेने आरोपी बाबत तांत्रिक माहिती गोळा करुन १९/०८/२०२६ रोजी गुन्हे शाखा, युनिट कंमांक ०१ चे अधिकारी व अंमलदार यांचे एक पथक आरोपी तौसिफ मल्का यांस अटक करण्यास मन्दसौर, राज्य मध्यप्रदेश येथे रवाना झाले होते. गुन्हे शाखा युनिट क्रमांक ०१ चे अधिकारी व अंमलदार यांनी वेषांतर करुन स्थानिक पोलीसांचे मदतीने सापळा रचून सदर आरोपीस २०/०८/२०२६ रोजी मुलतानपूरा, मन्दसौर, मध्यप्रदेश येथून कौशल्यपुर्वक अटक केली आली.

### गणेशोत्सव स्पर्धेत सहभागासाठी अर्ज करा

प्रतिनिधी २३ ऑगस्ट

**अकोला** - महाराष्ट्र शासनाने सार्वजनिक गणेशोत्सव हा राज्य महोत्सव म्हणून साजरा करण्याचा निर्णय घेतला आहे. या अंतर्गत उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ स्पर्धा तालुका, जिल्हा, राज्य, राष्ट्रीय त आंतरराष्ट्रीय स्तरावर घेण्यात येणार आहे. पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाने स्पर्थची घोषणा केली आहे, यासाठी इच्छुक व नोंदणीकृत मंडळांनी पु.ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमीच्या पोर्टलवर 7 सप्टेंबरपर्यंत ऑनलाइन अर्ज करणे आवश्यक आहे. यासाठी तालुका स्तरावर 25 हजार, जिल्हा स्तरावर 50 हजार, राजा-राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर 7 लाख 50 हजारांचे प्रथम पारितोषिक मिळणार आहे.

# २८ ऑगस्ट रोजीच साजरे होणार रक्षाबंधन

## अकोला पुरोहित संघाने दूर केला संभ्रम

प्रतिनिधी २३ ऑगस्ट



**अकोला :** पौर्णिमा तिथी २७ आणि २८ ऑगस्ट अशा दोन्ही दिवशी येत असल्याने सामान्य नागरिकांमध्ये रक्षाबंधन कधी साजरा करावा याबाबत संभ्रम निर्माण झाला होता. हा संभ्रम दूर करण्यासाठी अकोला पुरोहित संघातर्फे श्री बालाजी मंदिरात सभा आयोजित करण्यात आली होती.पुरोहित संघाने स्पष्ट केले की रक्षाबंधन बाबत कोणताही संभ्रम नाही. रक्षाबंधन शुक्रवार, २८ ऑगस्ट रोजीच साजरा केला जाणार आहे. शास्त्रात कोणताही संभ्रम नसतो, शास्त्र स्पष्ट असते. सर्व धर्मग्रंथानुसार जर भद्रा रहित पौर्णिमा तिथी २ तास २४ मिनिटांपेक्षा अधिक असेल तर ती सूर्योदय तिथीलाच करण्याचा निर्देश धर्मग्रंथ देतात. शुभ मुहूर्त पुढीलप्रमाणे राहतील. सुण मांडणे गुरुवार, २७ ऑगस्ट रोजी सकाळी ९:०८ वाजेच्या आधी. सुण जेवण शुक्रवार, २८ ऑगस्ट रोजी दिवसभर शुभ. राखी बांधण्याचा मुहूर्त अपरान्ह काळाला जास्त महत्त्व आहे.

चर - सकाळी ०६:०६ ते ०७:४०, लाभ - सकाळी ०७:४० ते ०९:१५, अमृत - सकाळी ०९:१५ ते १०:४९, शुभ - दुपारी १२:२३ ते ०१:५७, अभिजीत - दुपारी १२:०० ते १२:४८

पौर्णिमा तिथी सकाळी ०९:४७ पर्यंत राहील. पंचक लागल्याने या सणाला कोणताही दोष लागत नाही.

हा निर्णय धर्मसिंधू, निर्णयसिंधू, महाराष्ट्रीयन सम्राट, वल्लभ, मनीराम, निर्णय सागर इत्यादी पंचांगांच्या आधारे घेण्यात आला आहे. सभेला प्रामुख्याने पं. प्रमोद तिवारी, लाला तिवारी, भैरव शर्मा, श्याम सुंदर अवस्थी, मुरारी लाल जी पुजारी, रवि कुमार शर्मा आदी उपस्थित होते.



# भुलेश्वरमध्ये गणेश मूर्ती कोसळली; 2 भाविकांचा मृत्यू, 2 चिमुकल्यांसह 5 जण जखमी

प्रतिनिधी २३ ऑगस्ट

मुंबई: मुंबईतील भुलेश्वर येथे "भुलेश्वरचा राजा"च्या आगमन मिरवणुकीदरम्यान गणेश मूर्ती कोसळून मोठा अपघात झाला. ही घटना शनिवार, (२२ ऑगस्ट) रोजी रात्री ९:५१ वाजता बाळाराम मर्चंट रोड, कबुतरखाना, जय अंबे चौक, भुलेश्वर येथे घडली. २२ फूट उंच गणपतीची मूर्ती भायखळा येथून भुलेश्वरच्या दिशेने नेली जात होती आणि मंडपाच्या अगदी जवळ पोहोचण्यापूर्वीच तोल गेल्याने अवाढव्य गणेश मूर्ती अचानक कोसळली, त्यामुळे हा दुर्दैवी अपघात घडला.

मिळालेल्या माहितीनुसार, या अपघातात २ जणांचा जागीच मृत्यू झाला, तर ५ जण जखमी झाले आहेत. जखमींना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. तर घटनेची माहिती मिळताच तात्काळ बीएमसी अधिकारी-कर्मचारी, मुंबई पोलीस, अग्निशमन दल, वाहतूक पोलीस आणि १०८ रुग्णवाहिका घटनास्थळी



दाखल झाल्या होत्या. विविध रुग्णालयांकडून मिळालेल्या माहितीनुसार, मृतांमध्ये संकेत नेवसे (३३) यांना रिलायन्स रुग्णालयात आणण्यात आले होते, मात्र डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. तर बृजेश हेमंत जोशी (३०) यांना जी. टी. रुग्णालयात आणण्यात आले, जिथे डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. सर्व जखमींना जी. टी. रुग्णालयात दाखल करण्यात आले असून त्यांची प्रकृती स्थिर असल्याचे सांगण्यात येत आहे. यामध्ये वैभव घेनंद (३८ वर्षे), कुणाल काशीद (२६ वर्षे), पवन चौरसिया (२५ वर्षे), दिव्या गनेर (७ वर्षे), लावण्या गनेर (५ वर्षे) यांचा समावेश आहे.

## यंदा मुंबईत १० हजारांहून अधिक गणेश मंडप

» महाराष्ट्रात यंदा २०२६ चा 'गणेशोत्सव' सोमवार, (१४ सप्टेंबर) पासून सुरू होत आहे. यंदा तिथींच्या विशेष संयोगामुळे गणेशोत्सव १० किंवा ११ दिवसांऐवजी पूर्ण १२ दिवसांचा असणार आहे, ज्याची सांगता २५ सप्टेंबर (शुक्रवार) रोजी अनंत चतुर्दशीला विसर्जनाने होणार आहे. यंदा संपूर्ण महाराष्ट्रात सुमारे २८ लाख गणेश मूर्ती स्थापन होण्याचा अंदाज आहे. तर मुंबई आणि उपनगरात १० हजारांहून अधिक गणेश मंडळे आहेत, परंतु २,५०० मंडळांनी १० दिवसांच्या उत्सवासाठी स्थानिक प्रशासनाकडून परवानगी घेतली आहे. मुंबईत मंडपाच्या परवानगीसाठी ऑनलाइन सिंगल-विंडो सिस्टम देखील सुरू करण्यात आली आहे. यामध्ये बीएमसीसह पोलीस आणि वाहतूक पोलिसांची एनओसी देखील ऑनलाइन मिळणार आहे. यासाठी १३ सप्टेंबर २०२६ पर्यंत अर्ज करता येणार आहेत. महाराष्ट्रातील सर्वात प्रसिद्ध 'गणेशोत्सव'साठी गणेशभक्तांमध्ये बाप्पाच्या आगमनाबाबत प्रचंड उत्साह पाहायला मिळत आहे. संपूर्ण मुंबईत भव्य आणि दिव्य मंडप सजवले जात आहेत. मुंबईतील सर्वात प्रसिद्ध मंडप 'लालबागचा राजा' यंदा आपल्या ९३ व्या वर्षात पदार्पण करत असून, त्याचा मुख्य दरवाजा बद्रीनाथ-केदारनाथ मंदिराच्या थीमवर सजवला जात आहे.

## गणेशोत्सवातून समाजात जनजागृतीचा संदेश!

» महाराष्ट्रात १८९३ मध्ये लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांनी गणेश चतुर्थीच्या दिवशी महाराष्ट्राच्या घरांमध्ये साजरा होणाऱ्या गणेशोत्सवाला सार्वजनिक आणि संघटित स्वरूपात साजरा करण्याचा पुढाकार घेतला होता. त्यांचा उद्देश हा होता की, याच निमित्ताने देशातील तरुण एका ध्येयाने संघटित झाले, तर त्यांना देशाला स्वतंत्र करण्याच्या चळवळीत सहभागी करून घेता येईल. स्वातंत्र्यानंतर आजही 'गणेशोत्सवा'त अनेक मोठ्या गणपती मंडपांकडून राष्ट्रीय महत्त्वाच्या मुद्द्यांना वाचा फोडून समाजात जनजागृती केली जात आहे. ज्यामध्ये गेल्या वर्षीच्या गणेशोत्सवातील अधिक 'थीम' काही महिन्यांपूर्वी भारतीय लष्कराने शेजारील देश पाकिस्तानविरुद्ध राबवलेल्या 'ऑपरेशन सिंदूर'च्या थीमवर सजवण्यात आल्या होत्या.

# विनोद तावडे यांच्या रणनीतीमुळे यूपीमध्ये भाजपची हॅट्ट्रिक: कृपाशंकर सिंह

राजेश जायस्वाल २३ ऑगस्ट

मुंबई: भारतीय जनता पक्षाचे ज्येष्ठ नेते आणि उत्कृष्ट संघटनात्मक क्षमतेसाठी ओळखले जाणारे विनोद तावडे यांच्यावर उत्तर प्रदेश भाजपच्या प्रभारीपदाची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. त्यांच्या अनुभवाचा आणि संघटनात्मक कार्यकुशलतेचा उत्तर प्रदेश भाजपला मोठा फायदा होईल. त्यांच्या नेतृत्वाखाली आगामी निवडणुकांमध्ये भाजप विजयाची हॅट्रिक साधेल, असा विश्वास महाराष्ट्र सरकारचे माजी गृहराज्यमंत्री कृपाशंकर सिंह यांनी व्यक्त केला.

कृपाशंकर सिंह यांनी दिल्लीतील विनोद तावडे यांच्या निवासस्थानी त्यांची भेट घेतली. यावेळी दोन्ही नेत्यांमध्ये उत्तर प्रदेशातील पक्ष संघटना अधिक मजबूत करण्याबरोबरच आगामी राजकीय आव्हाने आणि निवडणुकीच्या तयारीबाबत चर्चा झाली. भेटीनंतर बोलताना कृपाशंकर सिंह म्हणाले की, विनोद तावडे हे भाजपचे विश्वासू आणि कुशल संघटक म्हणून ओळखले जातात. उत्तर प्रदेशसारख्या महत्त्वाच्या राज्याची जबाबदारी त्यांच्यावर सोपविणे हा पक्षाच्या रणनीतीतील महत्त्वाचा निर्णय आहे.

**उत्तर प्रदेशातील संघटनात्मक कामाचा आधीपासून अनुभव**

विनोद तावडे गेल्या सुमारे दोन वर्षांपासून अनौपचारिक स्वरूपात उत्तर प्रदेशातील भाजपच्या संघटनात्मक कामकाजाशी जोडले गेले होते. या काळात त्यांनी प्रदेशातील पक्ष संघटनेची कार्यपद्धती जवळून समजून घेतली.



तसेच पक्षाचे पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांशी संवाद साधून प्रभावी समन्वय निर्माण केला. आता अधिकृतपणे प्रदेश प्रभारीपदाची जबाबदारी मिळाल्यामुळे उत्तर प्रदेशातील पक्ष संघटनेला आणखी बळ मिळेल, असा विश्वास कृपाशंकर सिंह यांनी व्यक्त केला.

**बिहार, हरियाणातील अनुभवाचा उत्तर प्रदेशला फायदा**

कृपाशंकर सिंह यांनी सांगितले की, बिहार आणि हरियाणामध्ये भाजपची संघटनात्मक ताकद वाढविण्यात विनोद तावडे यांनी प्रभावी भूमिका बजावली आहे. त्यांची संघटनात्मक क्षमता, राजकीय अनुभव आणि रणनीती कौशल्य लक्षात घेऊन पक्ष नेतृत्वाने त्यांच्यावर उत्तर प्रदेशची जबाबदारी सोपविली आहे. उत्तर प्रदेश हे भाजपसाठी अत्यंत महत्त्वाचे राज्य आहे. त्यामुळे पक्ष संघटना मजबूत करण्यासोबतच सरकार आणि संघटना यांच्यातील समन्वय अधिक प्रभावी करण्याची गरज आहे. विनोद तावडे यांनी उत्तर प्रदेश भाजपच्या संघटनात्मक निवडणुकीत केंद्रीय निरीक्षक म्हणूनही काम केले आहे. त्यामुळे त्यांना राज्यातील



संघटनात्मक रचनेचा आणि कार्यकर्त्यांच्या कामकाजाचा चांगला अनुभव आहे.

**बूथ स्तरापर्यंत संघटना मजबूत करण्यावर भर**

विनोद तावडे यांच्या अनुभवाचा उत्तर प्रदेश भाजपला मोठा फायदा होईल. त्यांच्या नेतृत्वाखाली पक्ष बूथ स्तरापर्यंत संघटना अधिक मजबूत करेल आणि कार्यकर्त्यांना आगामी निवडणुकीच्या तयारीसाठी सक्रिय केले जाईल, असे कृपाशंकर सिंह यांनी सांगितले. भाजपचे उद्दिष्ट केवळ निवडणूक जिंकणे नसून संघटना सातत्याने मजबूत करून जनतेशी संपर्क अधिक व्यापक करणे हे आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्या नेतृत्वाखाली उत्तर प्रदेशात झालेल्या विकासकामांमुळे पक्ष कार्यकर्त्यांमध्ये मोठा उत्साह असल्याचेही त्यांनी सांगितले. तावडे यांच्या नेतृत्वाखाली उत्तर प्रदेशात भाजप आपली संघटनात्मक ताकद आणि निवडणूक कामगिरी आणखी उंचावेल आणि आगामी निवडणुकांमध्ये विजयाची हॅट्रिक साध्य करेल, असा विश्वास कृपाशंकर सिंह यांनी व्यक्त केला.

## हे गुरेही खात नाहीत, अंगणवाडी आहाराची तपासणी करण्याची 'एफडीए'कडे मागणी

मुंबई : सरकारने निश्चित केलेल्या प्रति लाभार्थी सात रुपये ३५ पैशांत पोषण आहार देताना दर्जा कसा राखणार,' असा सवाल महाराष्ट्र अंगणवाडी कृती समितीने केला आहे

गर्भवती, स्तनदा माता आणि तीन ते सहा वर्षांच्या मुलांना अंगणवाड्यांमधून दिल्या जाणाऱ्या पोषण आहाराच्या गुणवत्तेबाबत अंगणवाडी सेविकांच्या संघटनांनी गंभीर आक्षेप घेतले आहेत. 'हा आहार लाभार्थी काय, गुरेही खात नाहीत,' अशी तक्रार करत अन्न व औषध प्रशासनाने या आहाराचे नमुने तपासावेत, अशी मागणी करण्यात आली आहे. '२०१८ पासून आहाराचे दर वाढलेले नाहीत. मुंबईसह राज्यातील विविध भागांतील अंगणवाडी सेविकांच्या म्हणण्यानुसार, मागील सहा-सात वर्षांपासून तांदूळ, डाळ, खिचडी, शिरा आदी आहाराबाबत तक्रारी आहेत. वास येणारी खिचडी, कमी साखरेचा बेचव शिरा आणि निकृष्ट दर्जाचे अन्न लाभार्थी नाकारतात. गर्भावस्थेत असा आहार घेतल्यास आरोग्याला धोका निर्माण होईल का, अशी शंका लाभार्थ्यांकडून उपस्थित केली जाते; तरीही हा आहार घेतलेल्या लाभार्थ्यांची छायाचित्रे घेऊन माहिती कळवण्याची जबरदस्ती प्रकल्प अधिकाऱ्यांकडून केली जाते. अन्न निकृष्ट दर्जाचे असेल, तर ते घेण्यासाठी लाभार्थ्यांवर दबाव कसा आणणार, असा प्रतिप्रश्न अंगणवाडी सेविकांनी केला आहे. ग्रामीण भागामध्ये अंगणवाडी सेविका आहार शिजवून देतात आणि शहरी भागामध्ये बचतगटांच्या माध्यमातून तयार आहार दिला जातो. आहाराचे दर २०१८मध्ये प्रती लाभार्थी आठ रुपये असे ठरवण्यात आले होते. त्यातील ६५ पैसे आहार शिजवण्यासाठी इंधनखर्च येतो. हे पाहता प्रति लाभार्थी आहार सात रुपये ३५ पैसे या दराने दिला जातो.

# शिक्षण विभागाला शिंदेंचा अल्टिमेटम: मिशन मोडवर काम करण्याचे आदेश



प्रतिनिधी २३ ऑगस्ट

मुंबई: महाराष्ट्रातील शिक्षण व्यवस्थेत प्रत्यक्ष आणि गुणवत्तापूर्ण बदल घडवून आणण्यासाठी शिक्षण विभागाने 'मिशन मोड'वर काम करावे, असे निर्देश उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले. मुंबईतील नंदनवन बंगल्यावर शनिवारी शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे आणि शिक्षण विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांसोबत झालेल्या तब्बल चार तासांच्या बैठकीत त्यांनी राज्यातील शिक्षण क्षेत्राचा सविस्तर आढावा घेतला. या बैठकीत शिक्षण विभागाच्या विविध योजना, उपक्रम आणि आतापर्यंत झालेल्या प्रगतीची माहिती अधिकाऱ्यांनी सादर केली. विभागाकडून सुरू असलेल्या चांगल्या कामाचे कौतुक करताना, हे उपक्रम राज्यातील प्रत्येक शाळा आणि विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी अधिक वेगाने काम करण्याच्या सूचना उपमुख्यमंत्री यांनी दिल्या. आजच्या विद्यार्थ्यांच्या आकांक्षा आणि स्वप्ने बदलत आहेत. त्यानुसार आपल्या शाळाही बदलल्या पाहिजेत. महाराष्ट्रातील प्रत्येक मुलाला भविष्यातील संधी आणि आव्हानांसाठी तयार करणारी आधुनिक, गुणवत्तापूर्ण आणि भविष्यवेधी शिक्षणव्यवस्था निर्माण केली पाहिजे, असे एकनाथ शिंदे यांनी सांगितले. या कृती आराखड्यात शिक्षण क्षेत्रातील तज्ज्ञ आणि अनुभवी शिक्षकांचा सहभाग वाढवण्यासोबतच शिक्षकांसाठी प्रशिक्षण, प्रोत्साहन आणि प्रेरणादायी उपक्रम राबवण्यावर भर देण्यात येणार आहे. उत्कृष्ट काम करणाऱ्या शिक्षकांना प्रोत्साहन आणि योग्य सन्मान देण्याची सूचनाही करण्यात आली. शिक्षण म्हणजे केवळ अभ्यासक्रम आणि परीक्षा नसून विद्यार्थ्यांचा शारीरिक, मानसिक, बौद्धिक आणि भावनिक विकास हा शिक्षणव्यवस्थेचा केंद्रबिंदू असला पाहिजे, असे शिंदे यांनी स्पष्ट केले. त्यासाठी विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी, पोषण, मध्यान्ह भोजन योजना तसेच मानसिक आरोग्य आणि भावनिक स्वास्थ्याशी संबंधित उपक्रमांना अधिक महत्त्व देण्याच्या सूचना देण्यात आल्या.

**आमदार-खासदारांना शाळा दत्तक घेण्याचे आवाहन**

शाळांच्या विकासामध्ये पालक, माजी विद्यार्थी आणि स्थानिक समाजाची सक्रिय भागीदारी वाढविण्यावर भर देण्यात येणार आहे. शिक्षण विभागाच्या चांगल्या उपक्रमांची आणि त्यातून होणाऱ्या सकारात्मक बदलांची माहिती जनतेपर्यंत प्रभावीपणे पोहोचवण्याचे निर्देशही देण्यात आले. आपल्या मतदारसंघातील शाळांच्या विकासासाठी आमदार आणि खासदारांनी शाळा दत्तक घ्याव्यात, तसेच उपलब्ध निधी आणि स्थानिक संसाधनांच्या माध्यमातून शाळांच्या विकासात योगदान द्यावे, यासाठी त्यांना आवाहन करण्यात येणार आहे.

# मुंबईत कचऱ्यापासून होणार खडी आणि पेव्हर ब्लॉक

प्रतिनिधी २३ ऑगस्ट

मुंबई: मुंबईतील वाढत्या बांधकाम प्रकल्पांमुळे दररोज मोठ्या प्रमाणावर निर्माण होणाऱ्या बांधकाम व पाडकाम (सी अँड डी) कचऱ्याच्या वैज्ञानिक व्यवस्थापनासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेने मोठे पाऊल उचलले आहे.

बांधकाम व पाडकाम दोन हजार टन कचऱ्यावर प्रक्रिया करण्यासाठी मुंबई शहर व दोन्ही उपनगरात प्लांट उभारण्यात येणार आहे. या प्लांटमध्ये बांधकाम व पाडकामाच्या मलब्यापासून वाळू, खडी, पेव्हर ब्लॉकची निर्मिती करणे शक्य होणार आहे. विशेष म्हणजे प्रदूषणमुक्त मुंबईसाठी बांधकाम व पाडकाम कचरा वाहून नेणाऱ्या वाहनांवर जीपीएस सिस्टिम बसवणे बंधनकारक असणार आहे. मुंबई शहर, पूर्व उपनगरे आणि पश्चिम उपनगरे अशा तीन विभागांमध्ये स्वतंत्र सुविधा उभारण्यात

## बांधकाम मलब्यावर प्रक्रिया करण्यासाठी नवा प्लांट उभारणार



येणार आहेत. या सुविधांची एकत्रित प्रक्रिया क्षमता सुमारे दोन हजार टन प्रतिदिन (टीपीडी) इतकी असेल. सध्या मुंबईत बांधकाम आणि पाडकामातून दररोज ८ हजार मेट्रिक टन डेब्रिज निर्माण होत असून त्यातील मोठा हिस्सा रस्त्यांच्या कडेला, नाल्यांमध्ये किंवा मोकळ्या जागांमध्ये टाकला जातो. त्यामुळे प्रदूषण, वाहतूक कोंडी आणि पूरस्थिती निर्माण होण्यास मदत होते. यावर नियंत्रण मिळवण्यासाठी हा प्रकल्प महत्त्वाचा ठरणार आहे. प्रकल्पामुळे अनधिकृतपणे मलबा टाकण्याच्या प्रकारांवर आळा बसण्याबरोबरच नाले आणि जलवाहिन्यांमध्ये होणारे अडथळे कमी होतील तसेच पुनर्नवीनीकरण केलेल्या साहित्याचा वापर वाढल्यास विविध प्रकल्पांचा खर्चही कमी होऊ शकतो. शहरात एकात्मिक बांधकाम व पाडकाम कचरा प्रक्रिया सुविधा उभारण्यासाठी पालिकेने स्वारस्य अभिव्यक्ती (ईओआय) मागवली आहे. या अंतर्गत सुविधा उभारणे, अर्थपुरवठा, बांधकाम, संचालन आणि देखभाल करण्यासाठी खासगी एजन्सीची निवड करण्यात येणार आहे.

# मुंबई पोलिसांची मोठी कामगिरी; नागरिकांना 1 कोटी 15 लाखांचा मुद्देमाल परत

प्रतिनिधी २३ ऑगस्ट

मुंबई: बृहन्मुंबई पोलीस आयुक्त देवेन भारती यांच्या संकल्पनेतून आणि सह आयुक्त (का. व सु.) डॉ मनोजकुमार शर्मा यांच्या मार्गदर्शनाखाली आज एक स्तुत्य उपक्रम राबविण्यात आला.

बृहन्मुंबई पोलीस आयुक्तालयांतर्गत पूर्व परिमंडळ-३ मधील विक्रोळी, पार्कसाईट, भांडूप, कांजूरमार्ग, मुलुंड आणि नवघर या ६ पोलीस ठाण्यांच्या हद्दीतून हस्तगत करण्यात आलेला मुद्देमाल मूळ तक्रारदारांना परत करण्यासाठी २२ ऑगस्ट रोजी सायंकाळी ४ वाजता सामूहिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. पूर्व परिमंडळ-३ अधिनस्त पोलीस ठाण्यांमध्ये दाखल असलेल्या जबरी चोरी, घरफोडी, स्नॅचिंग, मोबाईल चोरी, इतर चोरीच्या गुन्ह्यांमधील गहाळ झालेली मालमत्ता पोलिसांनी तांत्रिक तपास करून हस्तगत केली होती.

हस्तगत करण्यात आलेले मौल्यवान दागिने, वाहने आणि मोबाईल फोन असा एकूण एक कोटी पंधरा लाख सत्तर हजार पाचशे रुपये किमतीचा मुद्देमाल अपर पोलीस आयुक्त, पूर्व प्रादेशिक विभाग धनंजय कुलकर्णी व पोलीस उप आयुक्त अभयसिंह देशमुख यांच्या हस्ते संबंधित तक्रारदारांना परत करण्यात आला. आपली चोरीला गेलेली मौल्यवान मालमत्ता पोलिसांकडून परत मिळाल्याने नागरिकांनी आनंद व्यक्त करत मुंबई पोलिसांचे आभार मानले.

# महापौरांच्या बंगल्यातील बदलांवरुन राजकारण तापले

प्रतिनिधी २३ ऑगस्ट

मुंबई: भायखळ्यातील वीरमाता जिजाबाई भोसले वनस्पती उद्यान आणि प्राणी संग्रहालयातील हेरिटेज महापौर बंगल्यात अद्ययावत सुविधा उपलब्ध करण्यात आल्या आहेत. यासाठी कोट्यवधी रुपये खर्च करण्यात आल्याचा आरोप विरोधकांनी केला आहे. कोट्यवधी रुपये खर्चुन हेरिटेज महापौर बंगल्यात नेमका काय बदल केला, महापौर बंगल्याचे नूतनीकरण या सगळ्या गोष्टींची पाहणी करण्यात येणार आहे. विरोधी पक्षनेत्या किशोरी पेडणेकर यांच्या नेतृत्वाखाली आणि काँग्रेसचे गटनेते अशरफ आजमी यांच्यासह विरोधी पक्षाचे नगरसेवक लवकरच महापौर बंगल्याची प्रत्यक्ष पाहणी करणार आहेत. महापौर रितू तावडे यांना पूर्वकल्पना देण्यासाठी पत्रही पाठविण्यात येणार असल्याचे विरोधकांनी सांगितले. महापौर बंगला ही लाकडी संरचनेची, कौलारू आणि हेरिटेज दर्जा असलेली एकमजली वास्तू आहे. प्रशासकीय काळात या बंगल्याचा वापर होत नसल्याने काही भागात वाळवी लागणे, लाकडी फर्निचरची दुरवस्था होणे अशा समस्या निर्माण झाल्या होत्या. त्यामुळे महापालिका निवडणुकीपूर्वी बंगल्याची डागडुजी करण्यात आली. त्यानंतर महापौर रितू तावडे यांनी पाहणी करून अंतर्गत दुरुस्ती आणि नूतनीकरणाच्या सूचना दिल्यानंतर

## ठाकरे सेना-काँग्रेस घेणार आढावा




पुन्हा व्यापक नूतनीकरणाची प्रक्रिया राबवण्यात आली. २ कोटी ९४ लाखांचा खर्च महापालिकेने मार्च महिन्यात यासाठी निविदा काढून एका कंपनीची नियुक्ती केली. वस्तू व सेवा करासह या कामांवर सुमारे २ कोटी ९४ लाख रुपये खर्च करण्यात आले. या अंतर्गत तळमजल्यावरील फरशीसाठी इटालियन मार्बलचा वापर, अत्याधुनिक सुविधांनी सुसज्ज स्वयंपाकघर, अंतर्गत फर्निचरची दुरुस्ती, सर्व शौचालयांचे नूतनीकरण, अतिरिक्त शयनकक्ष व शौचालयांची उभारणी तसेच सभागृहाचे बैठकीच्या खोलीत रूपांतर अशा विविध कामांचा समावेश होता.

**खर्चाबद्दल अनेक प्रश्नचिन्ह?**

हेरिटेज असलेल्या महापौर बंगल्यावर कोट्यवधी रुपये खर्च करण्यात आले आहेत. हा खर्च नेमका कोणत्या कामांसाठी झाला तसेच हेरिटेज वास्तूमध्ये करण्यात आलेल्या बदलांचे स्वरूप काय आहे, याबाबत अनेक प्रश्न उपस्थित होत आहेत. त्यामुळे हेरिटेज वास्तू असलेल्या महापौर बंगल्याची रितसर पत्र देऊन पाहणी करणार असल्याचे विरोधी पक्षनेत्या किशोरी पेडणेकर यांनी सांगितले. दरम्यान, महापौर बंगल्याच्या नूतनीकरणावर मोठा खर्च झाला आहे. विरोधी पक्षांनी पाहणीचा निर्णय घेतला असून काँग्रेसचे नगरसेवकही या दौऱ्यात सहभागी होतील, असे काँग्रेसचे गटनेते अशरफ आजमी यांनी सांगितले.

महापौर बंगल्याच्या नूतनीकरणावरील खर्चाबाबत आधीपासूनच राजकीय वर्तुळात चर्चा सुरू असताना महापौर कार्यालयाच्या समाजमाध्यम व्यवस्थापनासाठी प्रस्तावित करण्यात आलेल्या सुमारे २५ लाख रुपयांच्या खर्चावरूनही वाद निर्माण झाला होता. या पार्श्वभूमीवर विरोधी पक्षांनी आता प्रत्यक्ष पाहणी करून खर्चाचा तपशील जाणून घेण्याचा निर्णय घेतला आहे.

# शत्रू राष्ट्रांकडून युवाशक्तीला टार्गेट; सीएम फडणवीसांचा खळबळजनक दावा

प्रतिनिधी २३ ऑगस्ट

मुंबई: जगातील शक्तींना भारत देश जर पुढे पुढे असाच जात राहिला तर भारताला थांबविता येत नाही. भारताला पराजित करता येत नाही. भारताला सैन्य कारवाईत थांबविणे कठीण आहे, हे ठाऊक आहे. त्याचा प्रत्यय ऑपरेशन सिंदूरमुळे जगाला आहे. त्यामुळे भारताच्या युवाशक्तीला निष्प्रभ करण्यासाठी शत्रू राष्ट्रांकडून आणि असामाजिक घटक तरुणांना दारु, गुटखा ड्रग्स, नार्केटीक्स या व्यसनाच्या आहारी घालण्याचे षड्यंत्र रचले जात आहेत, असा गंभीर आरोप राज्याचे सीएम देवेंद्र फडणवीस यांनी केला आहे. नशा मुक्तीच्या लढाईत अमली पदार्थांची पुरवठा करणारी साखळी पूर्णपणे मोडून काढून तरुणांना व्यसनापासून दूर करण्यासाठी सर्वांनी सहकार्य करण्याचे आणि एकजुटीचे आवाहन देखील मुख्यमंत्री फडणवीस यांनी नागरिकांना केले आहे.



नवी मुंबई पोलिसांच्या 'नशामुक्त नवी मुंबई' अभियाना अंतर्गत महाविद्यालयीन युवक-युवतींमध्ये अमली पदार्थांच्या सेवनाविरोधात जनजागृती करण्यासाठी 'कॅम्पस कनेक्ट' या विशेष मोहिमेचा शुभारंभ शनिवारी मुख्यमंत्री फडणवीस यांच्या शुभहस्ते नेरूळ येथील डी. वाय. पाटील युनिव्हर्सिटीज सेंटर ऑफ एक्सलन्स येथे करण्यात आला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते व्यसनमुक्ती पुनर्वसन केंद्र व व्यसनमुक्त चित्रफितीचे लोकार्पणही करण्यात आले. तसेच या अभियानानिमित्त आयोजित जनजागृतीपार पोस्टर्स व रील्स स्पर्धेत निवडलेल्या सर्वोत्तम प्रत्येकी तीन विद्यार्थ्यांना मुख्यमंत्र्यांच्या हस्ते प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी सायरन ऑफसेट प्रिंटर्स एमआयडीसी क्र. २ पोलिस स्टेशन समोर ता. जि. अकोला येथे मुद्रित करून सिटी न्युज सुपरफास्ट कार्यालय ओम शिव साई सीएचएस, पहिला मजला, बीएमसी मार्केट, रनवाल व ओंकार ई-स्क्वेअर जवळ, सायन (पूर्व), मुंबई, महाराष्ट्र – ४०००२२. येथे प्रकाशित केले. ♦ मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख ♦ संपर्क - ०७२४ - २४३५५७३, २४४४७७४ - email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/ 26 /A 3072, RRC Helpline No. 8484842135